.nagpur

# NMC e NEWS LETTER

ऑक्टोबर २०१७

/nmcngp/ /ngpnmc/ www.nmcnagpur.gov.in/ http://news.nmcnagpur.org/

## नागपूरचा 'स्वच्छ' चेहरा ही सफाई कामगारांची देण

### महापौर नंदा जिचकार यांनी स्वच्छता कर्मचाऱ्यांसोबत साजरी केली दिवाळी

स्वच्छ आणि सुंदर नागपूर ही सफाई कामगारांची देण आहे. स्वत:चे आरोग्य धोक्यात घालून ते शहराची स्वच्छता करतात. त्यांच्या आरोग्याची काळजी घेणे हे आमचे कर्तव्य आहे. त्यासाठी मी प्रयत्न करीन, असे प्रतिपादन महापौर नंदा जिचकार यांनी केले.पाडव्याच्या निमित्ताने महापौर नंदा जिचकार यांनी आपली सकाळ स्वच्छता कर्मचाऱ्यांसोबत घालविली. स्वच्छता कर्मचाऱ्यां सोबत दिवाळी साजरी करत त्यांना मिठाईचे वाटप केले. तात्या टोपे नगरातील सभागृहात 'दिवाळी मिलन' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

# एकतेची ज्योत अखंड तेवत राहो : महापौर नंदा जिचकार

जेव्हा जेव्हा या देशावर संकट आले त्याकाळात देशवासीयांनी 'एकते'चे दर्शन घडविले. नागपूरकरांनी वेळोवेळी एकतेचा परिचय करून दिला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देत आज नागपूरकरांनी एकतेचे दर्शन घडविले. 'रन फॉर युनिटी'च्या माध्यमातून नागपूरकरांनी दिलेला 'स्वच्छ भारत'चा संदेश लाख मोलाचा असल्याचे प्रतिपादन महापौर नंदा जिचकार यांनी केले.
दिवंगत सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त नागपूर महानगरपालिकेच्या वतीने ३१ ऑक्टोबर रोजी संविधान चौकातून 'एकता दौड'चे आयोजन करण्यात आले होते. दौडच्या निमित्ताने आयोजित



नागपूर: राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या क्रीडा विभाग प्रमुख डॉ. माधुरी मार्डीकर, जिल्हा क्रीडा असोशिएशनचे अध्यक्ष शरद सूर्यवंशी, तालुका क्रीडा अधिकारी आशा मेश्राम, अविनाश पुंड, ग्रीन व्हिजील फाऊंडेशनचे कौस्तव चॅटर्जी, देवेंद्र दस्तुरे आदी उपस्थित होते.सहभागी संस्था नागपूर महानगरपालिकेच्या आवाहनाला साद देत 'एकता दौड'मध्ये नॅशनल फायर कॉलेज, वसंतराव नाईक शासकीय समाजविज्ञान संस्था, नागपूर जिल्हा थॅलेटिक संघटना, ग्रीन व्हिजील फाऊंडेशन, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ क्रीडा विभाग, प्री आय.ए.एस. कोचिंग सेंटर, नागपूर महानगरपालिकेचे क्रीडा शिक्षक, भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी, क्रीडा उपसंचालक कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी आदींनी सहभाग नोंदविला होता.

### 'रन फॉर युनिटी' : नागपूरकरांनी दिला एकता आणि स्वच्छतेचा संदेश



यावेळी मंचावर आ. सुधाकर कोहळे, आ. सुधाकर देशमुख, आ. मिलिंद माने, उपमहापौर दीपराज पार्डीकर, सत्तापक्ष नेते संदीप जोशी, आयुक्त अश्विन मुदगल, माजी महापौर व ज्येष्ठ नगरसेवक प्रवीण दटके उपस्थित होते.महापौर नंदा जिचकार पुढे म्हणाल्या, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात देश तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात महाराष्ट्र विकासाच्या दिशेने वाटचाल करीत आहे. गरीबांच्या आणि शेतकऱ्यांच्या हिताच्या अनेक योजना शासनाने केवळ घोषित केल्या नाहीत तर त्या अंमलात आणल्या. देशातील आणि राज्यातील शासनाचा कारभार गेल्या तीन वर्षात पारदर्शक राहिला आहे. पुढील काळात तो अधिक पारदर्शक राहील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. देशावर कुठलेही संकट आले तर या देशाचा नागरिक प्राणार्पण करायला तयार आहे. अशा या देशात नागरिकांच्या मनात एकतेची ज्योत सतत तेवत राहो, असे प्रतिपादन त्यांनी केले. गेल्या काही वर्षांत नागपूरकरांमध्ये त्यांच्या जबाबदारीविषयी जागृती झाली आहे. नागपूर स्वच्छ आणि सुंदर करण्यात नागपूरकरांचा वाटा मोठा आहे. त्यांच्याशिवाय ते शक्य नाही. 'रन फॉर युनिटी'च्या माध्यमातून 'एकते'सोबतच 'स्वच्छते'चाही संदेश नागपूरकर देत असून भविष्यात या देशातील सर्वात स्वच्छ शहर म्हणून नागपूरची ओळख होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. तत्पूर्वी महापौर नंदा जिचकार यांनी घाटरोड चौकातील सरदार वल्लभभाई पटेल यांच्या पुतळ्याला माल्यार्पण करून अभिवादन केले. त्यानंतर संविधान चौकातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला माल्यार्पण केले. कार्यक्रमस्थळी सरदार वल्लभभाई पटेल यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करण्यात आले. मार्गदर्शनानंतर दौडमध्ये सहभागी झालेल्यांना महापौर नंदा जिचकार यांनी 'एकते'ची शपथ दिली. त्यानंतर 'एकता दौड'ला त्यांनी हिरवी झेंडी दाखविली. महापौर नंदा जिचकार, आ. सुधाकर कोहळे, आ. सुधाकर देशमुख, आ. डॉ. मिलिंद माने, आयुक्त अश्विन मुदगल यांच्यासह महानगरपालिकेचे सर्व पदाधिकारी, अधिकारी, कर्मचारी आणि विविध संस्थांचे प्रतिनिधी सदस्य 'एकता दौड'मध्ये धावले. संविधान चौकातून सुरू झालेली ही दौड लिबर्टी टॉकीज, व्हीसीए मैदान, आकाशवाणी चौक मार्गे परत संविधान चौकात पोहोचली. तेथे दौडचे विसर्जन करण्यात आले.

## मनपाद्वारे विविध मार्गावरील बसेसचा शुभारंभ

### आमदार कृष्णा खोपडे यांनी दाखवली हिरवी झेंडी



नागपूर: नागपूर महानगरपालिका परिवहन समितीच्या वतीने शहरातील विविध मार्गावरील बसेसचा शुभारंभ सोमवारी (ता.३०.) करण्यात आला. यावेळी पूर्व नागपूरचे आमदार कृष्णा खोपडे, दक्षिण नागपूरचे आमदार सुधाकर कोहळे, परिवहन समिती सभापती जितेंद्र (बंटी) कुकडे, प्रतोद दिव्या धुरडे, लकडगंज झोन सभापती दीपक वाडीभस्मे प्रामुख्याने उपस्थित होते
आंबेडकर चौक (टेलिफोन एक्सचेंज चौक) ते वायसीसी कॉलेज या बसचे उद्घाटन टेलिफोन एक्सचेंज चौक येथे झाले. ही बस गंगाबाई घाट, भांडे फ्लॉट चौक, सक्करदरा चौक मार्गे क्रीडा चौक, तुकडोजी पुतळा, मानेवाडा चौक, छत्रपती चौक, हिंगणा टी पाईंट मार्गे वाय.सी.सी कॉलेज अशी धावेल. आंबेडकर चौकातून पहिली बस सकाळी ७.५० ला तर शेवटची बस दुपारी ३.वाजता आहे. वायसीसी कॉलेज येथून पहिली बस सकाळी ९.१० ला तर शेवटची बस दुपारी ४.१० वाजता आहे. शांतीनगर ते बर्डी (मार्गे मेडिकल चौक) या बसचा शुभारंभ तांडापेठ येथे करण्यात आला. ही बस इतवारी रेल्वे स्टेशन, गरोबा मैदान, नंदनवन चौक, भांडे प्लॉट, रेशीमबाग, क्रीडा चौक मार्गे बर्डी अशी धावेल. शांतीनगर येथून पहिली बस सकाळी ७.१० ला तर शेवटची बस संध्याकाळी ७.३० ला सुटणार आहे.
भरतवाडा ते मेडिकल चौक या मार्गावरील बसचा शुभारंभ भरतवाडा येथे करण्यात आला. ही बस भवानी मंदिर, भांडेवाडी, विडगाव फाटा, संघर्षनगर चौक, भीम चौक, जगनाडे चौक, सक्करदरा चौक, रेशीमबाग मार्गे मेडीकल चौक अशी धावेल. भरतवाडा येथून पहिली बस सकाळी ७.२० ला, शेवटची बस संध्याकाळी ७.वाजता तर मेडिकल चौक येथून पहिली बस सकाळी ९.२० वाजता, शेवटची बस रात्री ८ वाजता सुटणार आहे.

## गोरेवाडा ते बर्डी बस सेवेचा शुभारंभ

नागपूर: नागपूर महानगरपालिका परिवहन विभागाच्या वतीने 'आपली बस' या उपक्रमाअंतर्गत गोरेवाडा ते बर्डी या बस सेवेचा शुभारंभ मंगळवार (ता.३१) ला गोरेवाडा बस स्टॉप येथे करण्यात आला. यावेळी परिवहन समिती सभापती बंटी कुकडे, नगरसेविका अर्चना पाठक, संगीता गिऱ्हे प्रामुख्याने उपस्थित होते.गोरेवाडा येथून सुटणारी बस नायडु बंगला, काटोल नाका, दाभा गाव चौक, मारोती सेवा शोरूम, विद्यापीठ परिसर, रवीनगर, धरमपेठ मार्गे बर्डी अशी धावणार आहे. गोरेवाडा येथून पहिली बस सकाळी ७ वाजता तर अखेरची बस रात्री ९.३५ ला निघेल. बर्डी येथून पहिली बस ६ वाजता सुटेल तर शेवटची बस रात्री ८.३० ला निघेल. तिकीटाचे दर गोरेवाडा ते बर्डी २३ रूपये, ज्येष्ठ नागरिकांसाठी तिकीटीचे दर १२ रूपये इतके राहील.कार्यक्रमाला विनीत पाठक, विद्याधर मिश्रा, विनय कडु, दीपक सिंग, शिवप्रसाद, विक्की मिश्रा, रजनी पांडे, रेणू दास, परिवहन विभागाचे रामराव मातकर, एस.जी.सोनटक्के प्रामुख्याने उपस्थित होते.

## महापौरांनी दिले हुडको कॉलनीच्या समस्या सोडविण्याचे आश्वासन

### समन्वयासाठी पाच जणांची समिती गठीत : नागरिकांनी मानले आभार

नागपूर: जरीपटका परिसरातील हुडको कॉलनीमधील दूषित पाणी आणि इतर समस्या घेऊन मनपात आलेल्या नागरिकांच्या तक्रारींची दखल घेत महापौर नंदा जिचकार यांनी आज बुधवारी (ता. २५) तातडीने परिसराचा दौरा केला. नागरिकांच्या समस्या 'ऑन स्पॉट' ऐकून घेतल्या आणि पुढील काही दिवसांत या समस्यांना सोडविण्याचे आश्वासन त्यांनी दिले. महापौरांच्या या भूमिकेचे स्वागत करीत नागरिकांनी मनपाचे आभार मानले.
या दौऱ्यात महापौर नंदा जिचकार यांच्या समवेत उपमहापौर दीपराज पार्डीकर, आयुक्त अश्विन मुदगल, दुर्बल घटक समितीचे सभापती महेंद्र धनविजय, नगरसेविका प्रमिला मंथरानी, कार्यकारी अभियंता डी.डी. जांभूळकर, कार्यकारी अभियंता (विद्युत) एस.बी. जैस्वाल, कार्यकारी अभियंता प्रदीप राजगिरे, आरोग्य अधिकारी (स्वच्छता) डॉ. प्रदीप दासरवार, मंगळवारी झोनचे सहायक आयुक्त हरिश राऊत, जनसंपर्क अधिकारी अशोक कोल्हटकर, अभियंता नंदकिशोर सालोटकर, संजय चौधरी उपस्थित होते.
महापौर, उपमहापौर आणि आयुक्तांसमोर नागरिकांनी परिसरातील समस्या मांडल्या. दूषित पाण्याची समस्या गंभीर असून नागरिकांना पिण्यायोग्य पाणी उपलब्ध नसल्याची बाब नागरिकांनी लक्षात आणून दिली. दूषित पाण्याचे नमुने दाखविले. महापौर नंदा जिचकार यांनी गंभीर दखल घेत ओसीडब्ल्यूच्या अधिकाऱ्यांना याबाबत विचारणा केली. तातडीने या समस्येवर तोडगा काढण्याचे निर्देश त्यांनी दिले. गडर लाईनचा विषयही गंभीर असून यामुळे लोकांच्या आरोग्यावर परिणाम होत असल्याचे तेथे उपस्थित महिलांनी सांगितले. या दोन्ही समस्या सोडविण्यासाठी नागरिकांनी स्वत: पुढाकार घ्यावा, असे आवाहन महापौरांनी करीत पाच लोकांची समिती समन्वयासाठी गठीत करण्याचे सुचविले. महापौर नंदा जिचकार यांनी तातडीने दखल घेत हुडको कॉलनीत जाऊन समस्येवर तोडगा काढल्याने नागरिकांनी त्यांचे आभार मानले.
आयुक्त अश्विन मुदगल यांनीही अधिकाऱ्यांना निर्देश देत तातडीने समस्या मार्गी लावण्यास सांगितले.दुर्बल घटक समितीचे सभापती महेंद्र धनविजय यांनी परिसरातील समस्या सोडविण्यासाठी निधी मंजूर करून घेतला असल्याची माहिती दिली. लोकसहभागातून समस्या सोडविण्यासाठी मनपाने घेतलेल्या या भूमिकेचे स्वागत करीत नागरिकांनी महापौरांसह पदाधिकारी आणि अधिकाऱ्यांचे आभार मानले.

## स्मार्ट सिटीत मिळतील उत्तम दर्जाच्या सुविधा

### १५ नोव्हेंबर पर्यंत विकास आराखडा – अश्विन मुदगल

नागपूर: स्मार्ट सिटी प्रकल्पात पुनापूर, भरतवाडा, व पारडी भागाचा समावेश करण्यात आला आहे. नगररचना विभागाकडून १५ नोव्हेंबरपर्यंत याबाबतचा विकास आराखडा सादर केला जाईल. स्मार्ट सिटीत नागरिकांना उत्तम दर्जाच्या नागरी सुविधा मिळणार असल्याची माहिती महानगरपालिकेचे आयुक्त अश्विन मुदगल यांनी मंगळवारी (ता.२४) पत्रकारांना दिली. सिवरेज, स्ट्रॉम ड्रेनेज, रस्ते, पाणी व पथदिवे यासाठी उत्तम दर्जाच्या नागरी सुविधा स्मार्ट सिटीत अभिप्रेत आहे. या भागात प्रामुख्याने अनधिकृत ले–ऑऊटचा समावेश आहे. या सर्व भागाचा विकास केला जाणार आहे. ११ हजार लोकांनी संमतीपत्र दिले आहे. या प्रकल्पांसाठी केंद्र सरकारकडून १०० कोटीचा निधी प्राप्त झाला आहे तसेच राज्य सरकार व नासुप्रकडूनही निधी मिळाला आहे. प्रकल्पाच्या कामाला लवकरच गती मिळेल, असा विश्वास मुदगल यांनी व्यक्त केला.

#### सेफ ॲन्ड स्मार्ट सिटी

पॅनसिटी स्पेशल पर्पज व्हेईकल– नागपूर स्मार्ट न्ड सस्टेनेबल सिटी डेव्हलपमेंट कॉपोरेशनची स्थापना केली आहे. प्रकल्प व्यवस्थापनासाठी महापालिकेच्या नवीन प्रशासकीय इमारतीच्या सातव्या मजल्यावर कक्ष सुरू करण्यात आला आहे. शहरात सीसीटीव्ही लावण्यात आले आहे. शहरातील नागरिकांचे जीवन सुरक्षित असावे, हा त्यामागील हेतु असल्याचे मुदगल यांनी सांगितले.

# महापौरांनी विद्यार्थ्यांचा केला सत्कार

नागपूर: विभागीय, राज्यस्तरीय व राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत विविध क्रीडा प्रकारांत नैपुण्य मिळविणाऱ्या नागपूर महानगरपालिका शाळांतील विद्यार्थ्यांचा सत्कार महापौर नंदा जिचकार यांच्या हस्ते शुक्रवार (ता.१३) ला मनपा मुख्यालयातील महापौर कार्यालयात करण्यात आला.याप्रसंगी शिक्षण समिती सभापती दिलीप दिवे, क्रीडा समिती सभापती नागेश सहारे, बसपा गट नेता मोहम्मद जमाल, नगरसेविका लक्ष्मी यादव, नगरसेवक नरेंद्र (बाल्या) बोरकर, शिक्षणाधिकारी संध्यामेडपल्लीवार, सहायक शिक्षणाधिकारी कुसुम चाफलेकर, क्रीडा निरीक्षक नरेश चौधरी प्रामुख्याने उपस्थित होते.लाल बहादूर शास्त्री माध्यमिक शाळेच्या सुजीत यादव याने नागपूर येथे झालेल्या राज्यस्तरीय कराटे स्पर्धेत (आंतर १७ वयोगट) सुवर्णपदक प्राप्त करीत जयपूर येथे झालेल्या राष्ट्रीयस्तरावरील स्पर्धेत त्याची निवड झाली होती. त्यात त्याने नैपुण्य प्राप्त केले. मनपाच्या मौलाना आझाद माध्यमिक शाळेचा अफाझ खान याने राज्यस्तरीय थलेटिक्स स्पर्धेत (आंतर १४ वयोगट) नैपुण्य प्राप्त केले. नांदेड येथे झालेल्या राज्यस्तरीय हॉकी स्पर्धेत (आंतर १७ वयोगट) मोहम्मद तोहसीब याने प्रावीण्य मिळविले. विभागीय स्पर्धा चंद्रपूर येथे झालेल्या हॉकी स्पर्धेत शाहनवाज खान याने नैपुण्य प्राप्त केले. विवेकानंद हिंदी माध्यमिक शाळेच्या दिलीप कावरे याने राज्यस्तरीय जुडो स्पर्धेत (आंतर १७ वयोगट) नैपुण्य मिळवित नागपूर येथे झालेल्या विभागीय स्पर्धेत सुवर्ण पदक प्राप्त केले. तर वाल्मिकी नगर हिंदी माध्यमिक शाळेच्या रजनी रावल, प्रिया गुप्ता, रवि मिश्रा, रंजना ठाकूर यांनी विविध स्पर्धेत नैपुण्य प्राप्त केले. या सर्वांचा सत्कार महापौर नंदा जिचकार यांनी केला. महानगरपालिका शाळांचे नाव उंचावल्याबद्दल त्यांचे अभिनंदन करीत त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी मुख्याधापिका नियत परवीन, संध्या इंगळे, मुख्याधापक संजय पुंड, शारीरिक शिक्षक नरेश सवाईथूल, शारीरिक शिक्षिका संध्या भगत, रजनी परिहार उपस्थित होते.

## थोडक्यात...

### न्यायालयाच्या आदेशानुसारच टॉवर बांधकामास मंजुरी



नागपूर: उच्च न्यायालयाच्या आदेशानुसारच मोबाईल टॉवर बांधकामास मंजुरी देण्यात येईल. न्यायालयाच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार जर बांधकाम असेल तरच ना हरकत प्रमाणपत्र देण्यात यावे, असे आदेश स्थापत्य व प्रकल्प समिती सभापती संजय बंगाले यांनी दिले.मनपा मुख्यालयातील डॉ.पंजाबराव देशमुख सभागृहात पार पाडलेल्या स्थापत्य व प्रकल्प समितीच्या आढावा बैठकीत ते बोलत होते. याप्रसंगी उपसभापती अभय गोटेकर, समिती सदस्या पल्लवी शामकुळे, रश्मी धुर्वे, विद्या कन्हेरे, नगररचना विभागाच्या सहायक संचालक सुप्रिया थूल प्रामुख्याने उपस्थित होते.

### डागा पुण्यतिथी कार्यक्रम कस्तुरचंद पार्कवर



नागपूर: सर कस्तुरचंद डागा यांची १६ डिसेंबर २०१७ रोजी १०० वी पुण्यतिथी आहे. त्याप्रीत्यर्थ कस्तुरचंद पार्क येथे कार्यक्रमाचे आयोजनासाठी नागपूर हेरिटेज संवर्धन समितीने मंजुरी दिली आहे. बुधवारी (ता. २५ ऑक्टोबर) मनपा मुख्यालयात हेरिटेज संवर्धन समिती सभेचे आयोजन करण्यात आले. अध्यक्षस्थानी नीरीचे माजी संचालक डॉ. तपन चक्रवर्ती होते. सभेत हेरिटेज संवर्धन समितीचे सदस्य अतिरिक्त उपायुक्त जयंत दांडेगावकर, स्ट्रक्चरल अभियंता पी.एस.पाटणकर, रातुम नागपूर विद्यापीठाच्या इतिहास विभागाच्या डॉ. शुभा जोहरी, वास्तुविशारद, अर्बन डिझायनर अशोक मोखा, हेरिटेज समीतीच्या सदस्य सचिव तथा नगररचना विभागाच्या सहायक संचालक सुप्रिया थुल, धरमपेठ झोनचे सहायक आयुक्त महेश मोरोणे, नगररचनाकार प्रविण सोनारे, जनसंपर्क अधिकारी अशोक कोल्हटकर, सहायक जनसंपर्क अधिकारी प्रदीप खर्डेनविस यांची उपस्थिती होती.

### पोर्णिमा दिवस जनजागृती मोहीम बनली लोक चळवळ - आ. प्रा. अनिल सोले



नागपूर: नागपूर महानगरपालिका आणि ग्रीन व्हीजील फाऊंडेशनच्यावतीने पोर्णिमा दिनानिमित्त उर्जा बचतीसाठी राबविण्यात येत असलेले जनजागृती अभियान आता लोक चळवळ बनली आहे. नागरिक स्वतः यामध्ये सहभागी होऊन इतरांमध्येही याबद्दल जनजागृती करत असल्याचे प्रतिपादन आमदार प्रा. अनिल सोले यांनी केले. गुरुवारी (५ ऑक्टोबर) रोजी रात्री ८ ते ९ दरम्यान पंचशील चौक येथे उर्जाबचतीबद्दल जनजागृती करण्यात आली. प्रामुख्याने माजी महापौर व नगरसेवक प्रवीण दटके, लक्ष्मीनगर झोनचे सभापती प्रकाश भोयर, धरमपेठ झोनच्या सभापती रुपा राय, मनपा विधी समितीच्या सभापती मिनाक्षी तेलगोटे, नगरसेविका पल्लवी शामकुळे, सोनाली कडू, उज्ज्वला शर्मा, नगरसेवक किशोर वानखेडे, ग्रीन व्हीजील फाऊंडेशनचे कौस्तुव चॅटर्जी उपस्थित होते.

### विशेष समित्यांचा कामांचा वेग वाढवा

नागपूर महानगरपालिकेच्या विविध विशेष समित्यांच्या पदाधिकाऱ्यांनी जोमाने कामे सुरू केलेली आहेत. या कामांमध्ये ज्या-ज्या प्रशासकीय अडचणी येत आहेत, त्या तातडीने दूर करण्याचे निर्देश देत इतर अडचणींवर तोडगा काढण्यासाठी समिती पदाधिकाऱ्यांसोबत तातडीने बैठकांचे नियोजन करण्याचे आश्वासन महापौर नंदा जिचकार यांनी विषय समितींच्या सभापतींना दिले. उपमहापौर दीपराज पार्डीकर, सत्तापक्ष नेते संदीप जोशी, माजी महापौर व ज्येष्ठ नगरसेवक प्रवीण दटके, मनपातील भाजपच्या प्रतोद दिव्या धुरडे यांच्यासह स्थापत्य व प्रकल्प विशेष समितीचे सभापती संजय बंगाले, वैद्यकीय सेवा व आरोग्य समितीचे सभापती मनोज चापले, विधी विशेष समितीच्या सभापती ड. मिनाक्षी तेलगोटे, शिक्षण समितीचे सभापती प्रा. दिलीप दिवे, गलिच्छ वस्ती निर्मूलन व घरबांधणी विशेष समितीच्या सभापती चेतना टांक, क्रीडा समितीचे सभापती नागेश सहारे, महिला व बालकल्याण समिती सभापती वर्षा ठाकरे, जलप्रदाय समितीचे सभापती राजेश घोडपागे, अग्निशमन व विद्युत समितीचे सभापती ड. संजय बालपांडे, उपसभापती अभय गोटेकर, प्रमोद तभाने, श्रद्धा पाठक, प्रमोद चिखले, नगरसेवक पिंटू झलके आदी उपस्थित होते.

## झोननिहाय महिला स्वयंरोजगार मेळाव्याचे उद्घाटन

नागपूर: महिला बचत गटांच्या सक्षमीकरणाच्या उद्देशाने महिलांसाठी हक्काची कायमस्वरुपी बाजारापेठ मनपाच्या वतीने तयार करण्याचा मानस असून त्याची प्रक्रिया सुरू आहे. महिला बचतगटांद्वारे दर्जेदार उत्पादनांची निर्मिती करण्यात येते. मात्र बाजारपेठेअभावी त्यांना वाव मिळत नाही. मोठमोठ्या उद्योगांची सुरुवात अशीच होत असते. यातून प्रोत्साहन घेत, आपला उद्योग उभारा, मनपा आपल्या पाठीशी आहे, असे उद्गार महापौर नंदा जिचकार यांनी काढले. नागपूर महानगरपालिकेच्या समाजकल्याण विभागाद्वारे महिला व बालकल्याण समितीच्या माध्यमातून मनपाच्या नऊ झोनमध्ये दोन दिवसीय महिला स्वयंरोजगार मेळाव्याचे आयोजन १२ व १३ ऑक्टोबर दरम्यान सकाळी १० ते सायंकाळी ८ पर्यंत करण्यात आले आहे. या मेळाव्याच्या उद्घाटनप्रसंगी धरमपेठ झोन कार्यालयात आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या. यावेळी महिला व बालकल्याण समिती सभापती वर्षा ठाकरे, धरमपेठ झोन सभापती रुपा राय, नगरसेवक सुनील हिरणवार, जगदिश ग्वालवंशी, नगरसेविका उज्ज्वला शर्मा, दर्शनी धवड, सहायक आयुक्त महेश मोरोणे यांची उपस्थिती होती.लक्ष्मीनगर झोन येथे आयोजित महिला स्वयंरोजगार मेळाव्याचेही उद्घाटन महापौर नंदाजिचकार यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमात लक्ष्मीनगर झोन सभापती प्रकाश भोयर, विधी समिती सभापती ड. मिनाक्षी तेलगोटे, नगरसेविका लक्ष्मी यादव, झोनच्या सहायक आयुक्त सुवर्णा दखने यांची उपस्थिती होती.मनपाच्या सर्व झोनमध्ये आयोजित मेळाव्याचे उद्घाटन महिला व बाल कल्याण समिती सदस्य व झोन सभापतींच्या हस्ते झाले.



## व्यावसायिक रुग्णालयांच्या बाह्य रुग्ण नोंदणीचे शुल्क वाढणार

### मनपा आरोग्य समितीच्या बैठकीत मंजुरी : सभागृहापुढे नवे धोरण ठेवणार

नागपूर: शहरात सध्या अस्तित्वात असलेल्या आणि नव्याने नोंदणीसाठी मनपाकडे येणाऱ्या व्यावसायिक रुग्णालयांसाठी आता नवे बाह्य रुग्ण धोरण लागू होणार आहे. सदर धोरणाचा आराखडा तयार झाला असून मनपाच्या आरोग्य समितीने काही सूचनांसह मंजुरी दिली आहे. नवे सुधारीत धोरण लवकरच सर्वसाधारण सभेत ठेवण्यात येणार आहे. या धोरणानुसार आता शहरातील रुग्णालयांच्या बाह्य रुग्ण व्यावसायिक नोंदणीचे शुल्क वाढणार आहे.
सध्या व्यावसायिक रुग्णालयांना मनपामध्ये बाह्य रुग्ण नोंदणी करायची असेल तर वर्षाकाठी केवळ ५०० रुपये नोंदणी शुल्क आकारले जाते. नवे धोरण मंजूर झाल्यानंतर सदर रुग्णालयांना वर्षाकाठी चार हजार रुपये नोंदणी शुल्क अदा करावे लागतील. धोरणामध्ये अन्य बाबीसुद्धा समाविष्ट असून नवीन रुग्णालयाला नगररचना विभाग आणि अग्निशमन विभागाच्या ना-हरकत प्रमाणपत्र मिळाल्यानंतरच आरोग्य विभागातर्फे नोंदणी करण्यात येईल. महापौर नंदा जिचकार, प्रतोद दिव्या धुरडे, वैद्यकीय व आरोग्य समितीचे सभापती मनोज चापले, समिती सदस्य नगरसेवक लखन येरावार, विजय चुटेले, नगरसेविका विशाखा बांते, भावना लोणारे, आशा उईके, वंदना चांदेकर, अतिरिक्त उपायुक्त जयंत दांडेगावकर, आरोग्य अधिकारी (स्वच्छता) डॉ. प्रदीप दासरवार, आरोग्य अधिकारी (मे) डॉ. अनिल चिव्हाणे, वैद्यकीय अधिकारी डॉ. विजय जोशी, पशुचिकित्सा अधिकारी डॉ. गजेंद्र महल्ले, मलेरिया व हत्तीरोग अधिकारी जयश्री थोटे, डॉ. सुनील घुरडे, मुकुंद खोजे, कारखाना विभागाचे राजेश गुरुनुले उपस्थित होते.



कस्तुरचंद पार्कची पाहणी करताना महापौर नंदा जिचकार

## शैक्षणिक स्तर वाढविण्यासाठी मनपाचे शिक्षक सक्षम

नागपूर: मनपातील शाळांचा आणि पर्यायाने विद्यार्थ्यांचा शैक्षणिक स्तर उंचावण्यासाठी मनपा कटिबद्ध आहे. मनपाच्या शाळेतील विद्यार्थांचा शैक्षणिक स्तर वाढविण्यासाठी मनपाचे शिक्षक सक्षम आहेत, असे प्रतिपादन महानगरपालिकेच्या शिक्षण विशेष समितीचे सभापती दिलीप दिवे यांनी केले.
मनपाच्या शिक्षण विभागातर्फे महाल येथील राजे रघुजी भोसले नगर भवन येथे शिक्षकांसाठी बुधवारी प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रमाअंतर्गत मनपा व प्रादेशिक विद्या प्राधिकरण यांच्या संयुक्त विद्यमाने मनपाच्या शाळेतील मुख्याधापक व शिक्षक यांच्या एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. व्यासपीठावर शिक्षणाधिकारी संध्या मेडपल्लीवार, वक्ते प्रादेशिक विद्या प्राधिकरणचे अधिव्याख्याता प्रा. रवींद्र रगतकर, केंद्रप्रमुख भूपेश चव्हाण, विषय सहायिता प्रतिभा गोहणे, मनपा शिक्षण संघाचे सचिव देवराव मांडवकर उपस्थित होते. विद्यार्थांचा पाया म्हणजे प्राथमिक शिक्षण होय. तो पायाच मजबूत केला तर त्यानुसार विद्यार्थी घडायला मदत होते. शाळेची व विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढविण्यासाठी कसा प्रयत्न करता येईल याचा विचार शिक्षकांनी करावा, असे ते म्हणाले.

## व्यावसायिक रुग्णालयांच्या बाह्य रुग्ण नोंदणीचे शुल्क वाढणार

नागपूर: शहरात सध्या अस्तित्वात असलेल्या आणि नव्याने नोंदणीसाठी मनपाकडे येणाऱ्या व्यावसायिक रुग्णालयांसाठी आता नवे बाह्य रुग्ण धोरण लागू होणार आहे. सदर धोरणाचा आराखडा तयार झाला असून मनपाच्या आरोग्य समितीने काही सूचनांसह मंजुरी दिली आहे. नवे सुधारीत धोरण लवकरच सर्वसाधारण सभेत ठेवण्यात येणार आहे. या धोरणानुसार आता शहरातील रुग्णालयांच्या बाह्य रुग्ण व्यावसायिक नोंदणीचे शुल्क वाढणार आहे. सध्या व्यावसायिक रुग्णालयांना मनपामध्ये बाह्य रुग्ण नोंदणी करायची असेल तर वर्षाकाठी केवळ ५०० रुपये नोंदणी शुल्क आकारले जाते. नवे धोरण मंजूर झाल्यानंतर सदर रुग्णालयांना वर्षाकाठी चार हजार रुपये नोंदणी शुल्क अदा करावे लागतील. धोरणामध्ये अन्य बाबीसुद्धा समाविष्ट असून नवीन रुग्णालयाला नगररचना विभाग आणि अग्निशमन विभागाच्या ना-हरकत प्रमाणपत्र मिळाल्यानंतरच आरोग्य विभागातर्फे नोंदणी करण्यात येईल.मनपा आरोग्य समितीची बैठक गुरुवारी मनपा मुख्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख सभागृहात आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीला महापौर नंदा जिचकार, प्रतोद दिव्या धुरडे, वैद्यकीय व आरोग्य समितीचे सभापती मनोज चापले, समिती सदस्य नगरसेवक लखन येरावार, विजय चुटेले, नगरसेविका विशाखा बांते, भावना लोणारे, आशा उईके, वंदना चांदेकर, अतिरिक्त उपायुक्त जयंत दांडेगावकर, आरोग्य अधिकारी (स्वच्छता) डॉ. प्रदीप दासरवार, आरोग्य अधिकारी (मे) डॉ. अनिल चिव्हाणे, वैद्यकीय अधिकारी डॉ. विजय जोशी, पशुचिकित्सा अधिकारी डॉ. गजेंद्र महल्ले, मलेरिया व हत्तीरोग अधिकारी जयश्री थोटे, डॉ. सुनील घुरडे, मुकुंद खोजे, कारखाना विभागाचे राजेश गुरुनुले उपस्थित होते. सदर बैठकीत डॉ. अनिल चिव्हाणे यांनी मनपा आरोग्य विभागातर्फे तयार करण्यात आलेल्या धोरणाचे समितीपुढे वाचन करण्यात आले. यावर चर्चा झाल्यानंतर काही सूचनांसह त्याला मंजुरी देण्यात आली. लवकरच सर्वसाधारण सभेपुढे मंजुरीसाठी ठेवण्यात येणार असल्याची माहिती सभापती मनोज चापले यांनी दिली.